प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा जिल्हा यांच्या सातारा जिल्हयातील नीरा, कृष्णा व येरळा नदीवरील प्रस्तावित ५ वाळु स्थळांच्या जसे की, मु.पो.वाठार बु॥, ता.खंडाळा (१ वाळू घाट), मु.पो.जिहे, ता.सातारा (१ वाळू घाट), मु.पो.सोनगांव स.निंब, ता.सातारा (१ वाळू घाट), मु.पो.गोजेगांव, ता.सातारा (१ वाळू घाट), मु.पो.भुरकवाडी व सिध्देश्वर कुरोली, ता.खटाव (१ वाळू घाट) जाहिर लिलावाबाबतच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्तांत.

संदर्भः-

१) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार

२) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४-०९-२०२० चे निर्देश

३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे क्रं.बी-२००९१७-एफटीएस-००८२, दिनांक १७-०९-२०२० चे निर्देश

४) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ह्यांचे दिनांक ०३-१२-२०१९ चे निर्देश.

प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा जिल्हा- सातारा यांच्या सातारा जिल्ह्यातील नीरा, कृष्णा व येरळा नदीवरील प्रस्तावित ५ वाळु स्थळांच्या जसे की, मु.पो.वाठार बु॥, ता.खंडाळा (१ वाळू घाट), मु.पो.जिहे, ता.सातारा (१ वाळू घाट), मु.पो.सोनगांव स.निंब, ता.सातारा (१ वाळू घाट), मु.पो.गोजेगांव, ता.सातारा (१ वाळू घाट), मु.पो.भुरकवाडी व सिध्देश्वर कुरोली, ता.खटाव (१ वाळू घाट) जाहिर लिलावाबाबतच्या संदर्भात पर्यावरण विषय जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक १९/०३/२०२१ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा, जि.सातारा येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई -३० /२०२१ व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- २१०३१६- एफटीएस-००७३ दिनांक १६/०३/२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, सातारा
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष

२) प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी) -सदस्य



Scanned with CamScanner

– आयोजक

३) उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सातारा

श्री एल. एस, भड, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (संदर्भ क्रं. २ वरिलप्रमाणे) व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई (संदर्भ क्रं. ३ वरिलप्रमाणे) दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी (Physical Public Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या सत्रात १०० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास उर्वरित व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधी देण्यात येईल. सर्व उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधी देण्यात येईल असे सांगितले. त्यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर सभागृहात प्रवेश करताना करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी श्री सुनील थोरवे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सातारा तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री भड यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ह्यांच्या ०३-१२-२०१९ पत्रानुसार प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा जिल्हा- सातारा यांच्या सातारा जिल्ह्यातील नीरा, कृष्णा व येरळा नदीवरील प्रस्तावित ५ वाळु स्थळांच्या जसे की, मु.पो.वाठार बु॥, ता.खंडाळा (१ वाळू घाट), मु.पो.जिहे, ता.सातारा (१ वाळू घाट), मु.पो.सोनगांव स.निंब, ता.सातारा (१ वाळू घाट), मु.पो.गोजेगांव, ता.सातारा (१ वाळू घाट), मु.पो.भुरकवाडी व सिध्देश्वर कुरोली, ता.खटाव (१ वाळू घाट) या स्थळांच्या जाहिर लिलावाबाबतच्या संदर्भात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीसाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

आयोजक यांनी सांगितले की पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार आणि पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक ०३-१२-२०१९ च्या निर्देशांनुसार विशिष्ट प्रकल्पांन

Scanned with CamScanner

पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, सातारा यांनी स्थानिक वृत्तपत्र सकाळ मराठी आवृत्ती व दि इंडीयन एक्प्रेस इंग्रजी वृत्तपत्रामध्ये दि.१८-०२-२०२१ रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचनेप्रमाणे वाळूघाटासंबंधिची ठळक वैशिष्ट्ये असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या व कार्यकारी सारांशाच्या प्रती व मराठी व इंग्रजीत संक्षिप्त माहिती असलेले कागदपत्रे शासनाच्या सूचित कार्यालयात म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, पश्चिम-मध्य विभाग कार्यालय, न्यू सेक्रेटरिएट इमारत, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी -जिल्हा परिषद, सातारा, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सातारा, तहसिलदार सातारा, तहसिल कार्यालय, सातारा, ता. जि.सातारा. तहसिलदार खंडाळा, तहसिल कार्यालय, खंडाळा, ता. खंडाळा, जि.सातारा, तहसिलदार खटाव (वडूज), तहसिल कार्यालय, खटाव (वडूज), ता.खटाव, जि. सातारा. ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.वाठार, ता.खंडाळा, जि.सातारा. ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.जिहे, ता.जि.सातारा. ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.सोनगांव स.निंब, ता.जि.सातारा, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.गोजेगांव ता.जि.सातारा, जि.सातारा, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.भुरकवाडी, ता.खटाव, जि.सातारा, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.सिध्देश्वर कुरोली, ता.खटाव, जि.सातारा, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पांबद्दल एकही आक्षेप,हरकती, सूचना म.प्र.नि. मंडळ कार्यालयास प्राप्त झालेला नाही. त्यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. श्री भड यांनी पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सातारा तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागारांना प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली. प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार सातारा जिल्ह्यातील नीरा, कृष्णा व येरळा नदीवरील प्रस्तावित ५ वाळु स्थळांच्या जसे की, मु.पो.वाठार बु॥, ता.खंडाळा (१



Scanned with CamScanner

वाळू घाट), मु.पो.जिहे, ता.सातारा (१ वाळू घाट), मु.पो.सोनगांव रा.निंब, ता.सातारा (१ वाळू घाट), मु.पो.गोजेगांव, ता.सातारा (१ वाळू घाट), मु.पो.भुरकवाडी व सिध्देश्वर कुरोली, ता.खटाव (१ वाळू घाट) या रेतीघाट स्थळांच्या जाहिर लिलावाबाबतच्या पर्यावरणविषयक उपाययोजनांसह पर्यावरणविषयक विकासासाठी राखीव ठेवलेला निधी व प्रस्तावित सामाजिक उपक्रम याविषयी माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली.

सादरीकरणानंतर मा. अध्यक्षांनी उपस्थित जनसमुदायाला याबाबत आपल्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी नोंदविण्याचे आवाहन केले.

खालील उपस्थितांना चर्चेत भाग घेतला व प्रश्न विचारले व त्याअनुषंगाने पर्यावरण सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक / यांनी दिलेली सविस्तर माहिती आणि प्रश्न उत्तरे खालीलप्रमाणेः-

१) श्री.महेश जाधव, सदस्य ग्रामपंचायत जिहे, तालुका-सातारा, जिल्हा-साताराः-

- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, सदर वाळू स्थळांचे लिलाव करण्यात येणार असून, सदर ठिकाणचा वाळू उपसा हा फावडे, पाटी अशा पारंपारिक पध्दतीने करण्यात येणार आहे.

२) सौ.माधुरी गणेश शिंदे, सरपंच ग्रामपंचायत सोनगांव सं.निंब, तालुका-सातारा, जिल्हा-साताराः-

सदर वाळू उपशाची वाहतूक ही गावातून करण्यात येणार की कसे ? वाहतूक करते वेळी रस्ता खराब झाल्यास त्या रस्त्याची दुरुस्ती केली जाणार का?

- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, शक्यतो वाळू उपशाची वाहतूक ही गावातील मुख्य रस्त्यावरून करण्यात येणार नाही. अशा स्थितीत आपण पर्याय म्हणून दुसरा रस्ता वापरु शकतात. त्यांनी सांगितले की पर्यावरण व्यवस्थापन योजनेत (EMP) हा विचार करण्यात आलेला आहे. शक्यतो नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाईल. जिल्हा पर्यावरण समितीचेही त्यावर लक्ष असेल. जर संबंधित रस्ता डांबरी असेल तर त्यावेळी आपण त्या रस्त्यावर वाहतुक करत नाही. पण तरीही तो नादुरुस्त झाला, तर संबंधित समिती त्याबाबत पुढील कार्यवाही करते. अंदाजपत्रकात रस्ता दुरुस्तीचे तरतुद असते. गौणखनिज निधीतून ग्रामपंचायतीस निधी रस्ता दुरुस्तीसाठी पुरविण्यात येईल.

३) श्री.महेश जाधव, सदस्य ग्रामपंचायत जिहे, तालुका-सातारा, जिल्हा-साताराः-

वाळू उत्खनन किती फुटापर्यंत करण्याची परवानगी असणार आहे याबाबत विचारणा करण्यात आली.

- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, वाळू उत्खनन हे १ मीटरच्या खाली करण्यात येणार नाही.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी काही आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. त्यावेळी आयोजक यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याची इतिवृत्तात नोंद घेण्यात येणार आहे. अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व



Scanned with CamScanner

इतिवृत्त महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मुंबई येथील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिकांनी बैठकीत उपस्थित राहून सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे, प्रकल्प अधिकारी व शासकीय अधिकारी यांचे आभार मानले व अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती अध्यक्ष यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी बैठक संस्थगित करण्यात आली.

(सुनील थोरवे),
अध्यक्ष
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सातारा
जिल्हा- सातारा

( लिं.सु. भड),
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, सातारा

Scanned with CamScanner